**A**

**CCE RR**
**UNREVISED FULL SYLLABUS**

# ಕರ್ನಾಟಕ ಶಾಲಾ ಪರೀಕ್ಷೆ ಮತ್ತು ಮೌಲ್ಯನಿರ್ಣಯ ಮಂಡಲಿ, ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು – 560 003

## KARNATAKA SCHOOL EXAMINATION AND ASSESSMENT BOARD, MALLESHWARAM, BENGALURU – 560 003

**ಎಸ್.ಎಸ್.ಎಲ್.ಸಿ. ಪರೀಕ್ಷೆ, ಜೂನ್ – 2023**

**S.S.L.C. EXAMINATION, JUNE – 2023**

**ಮಾದರಿ ಉತ್ತರಗಳು**

**MODEL ANSWERS**

ದಿನಾಂಕ : 12. 06. 2023 ] ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **08-M**

Date : 12. 06. 2023 ] **Code No. : 08-M**

## ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

## Subject : First Language — MARATHI

**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Regular Repeater )**

[ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100

[ Max. Marks : 100

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| I. | **खालील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिले आहेत. त्यापैकी योग्य पर्यायी उत्तर निवडून उत्तरे लिहा :** 6 × 1 = 6 | |
| 1. | 'तेजःकण' हे खालीलपैकी कोणत्या संधीचे उदाहरण आहे ?<br>(अ) स्वर संधी (ब) व्यंजन संधी<br>(क) विसर्ग संधी (ड) यापैकी नाही<br>**उत्तर :** (क) विसर्ग संधी | 1 |

[ Turn over

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 2. | ''आदिती अभ्यास करत आहे'' या वाक्यात हा काळ आहे –<br>(अ) वर्तमानकाळ (ब) भूतकाळ<br>(क) भविष्यकाळ (ड) पूर्ण भूतकाळ<br>**उत्तर :** (अ) वर्तमानकाळ | 1 |
| 3. | ''नावडतीचे ............. अळणी'' ही म्हण पूर्ण होण्यासाठी योग्य शब्द हा आहे –<br>(अ) पीठ (ब) भाजी<br>(क) पोळी (ड) मीठ<br>**उत्तर :** (ड) मीठ | 1 |
| 4. | ''आराध्या गाणे गाते.'' या वाक्यात हा प्रयोग आहे –<br>(अ) कर्मणी (ब) कर्तरी<br>(क) भावे (ड) यापैकी नाही<br>**उत्तर :** (ब) कर्तरी | 1 |
| 5. | 'दररोज प्रसिद्ध होणारे' या शब्दसमूहासाठी एक योग्य शब्द हा आहे –<br>(अ) दैनिक (ब) वार्षिक<br>(क) मासिक (ड) साप्ताहिक<br>**उत्तर :**(अ) दैनिक | 1 |
| 6. | 'पृथ्वी' या शब्दाचा समानार्थी शब्द हा आहे –<br>(अ) जल (ब) भास्कर<br>(क) वसुंधरा (ड) जीवन<br>**उत्तर :** (क) वसुंधरा | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| II. | **पहिल्या दोन पदांचा संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा :** 4 × 1 = 4 | |
| 7. | चा, ची, चे : षष्ठी विभक्ती : : त, ई, आ : ................ <br> **उत्तर :** सप्तमी विभक्ती | 1 |
| 8. | पद्मनाभ : बहुव्रीही समास : : पेरापेरांत : ............. <br> **उत्तर :** अव्ययीभाव समास | 1 |
| 9. | हिमालय : विशेष नाम : : खेळतो : ................. <br> **उत्तर :** क्रियापद | 1 |
| 10. | सत्य : असत्य : : अल्पायुषी : ....................... <br> **उत्तर :** दीर्घायुषी | 1 |
| III. | **पुढील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :** 7 × 1 = 7 | |
| 11. | गणातात्यांनी किती वाटण्या करण्यास सांगितल्या ? <br> **उत्तर :** 'तीन' | 1 |
| 12. | गंगूबाईंनी कोणत्या चित्रपटात भूमिका केली ? <br> **उत्तर :** 'विजयाचे लग्न' | 1 |
| 13. | संत ज्ञानेश्वरांनी कोणत्या ठिकाणी संजीवन समाधी घेतली ? <br> **उत्तर :** 'आळंदी' | 1 |
| 14. | दोघा जावांचं बोलण गणातात्यांना कसे झोंबत होते ? <br> **उत्तर :** डागण्या दिल्यावाणी | 1 |
| 15. | पावसाने झोडपल्यावर गुराखी कोठे उभा राहतो ? <br> **उत्तर :** गाईच्या पोटाखाली | 1 |
| 16. | कवी कावळ्याचे पाय कशाने मढविणार आहेत ? <br> **उत्तर :** सोन्याने | 1 |
| 17. | गुराख्याचे पाय कशामुळे निब्बर होतात ? <br> **उत्तर :** काट्याकुपाटीत गेल्यामुळे / काटेकुटे मोडल्याने | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| IV. | **खालील प्रश्नांची उत्तरे सूचनेप्रमाणे लिहा :** $3 \times 2 = 6$ | |
| 18. | खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.<br>अ) पांग फेडणे ब) कैलासवासी होणे.<br>**उत्तर :** वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :<br>अ) पांग फेडणे – उपकार फेडणे 1<br>ब) कैलासवासी होणे – मरण पावणे 1<br>वाक्प्रचाराचा अर्थ सांगणे $\frac{1}{2}$ गुण<br>वाक्यात उपयोग $\frac{1}{2}$ गुण<br>(वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग व्हावा अर्थाचा नव्हे) | 2 |
| 19. | अलंकार ओळखून लक्षणे लिहा.<br>‘दंड कमंडलू बंड माजविशी मुंडमुंडशी तपा.’<br>**उत्तर :** अलंकाराचे नाव : अनुप्रास अलंकार<br>लक्षणे : एखाद्या वाक्यात किंवा कवितेच्या चरणात एक किंवा अनेक अक्षराची पुनरावृत्ती होऊन त्यातील नादामुळे जेव्हां त्याला सौंदर्य प्राप्त होते तेव्हा ‘अनुप्रास अलंकार’ होतो.<br>येथे ‘म’, ‘ड’ अक्षरांची पुनरावृत्ती झाली आहे. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 20. | गण पाडून वृत्त ओळखा.<br>'घालील धाड शिशुपाल कळे न केव्हा.'<br><br>**उत्तर :** घालोल \| धाडशि \| शपाल \| कळन \| केव्हा<br>– – U \| – U U \| U – U \| U – U \| – –<br>त \| भ \| ज \| ज \| ग ग<br><br>**लक्षणे :**<br>अक्षरे – 14<br>गण – त, भ, ज, ज, ग, ग<br>यती – 8 व्या अक्षरावर<br>वृत्त – वसंत तिलका | 2 |
| V. | **खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा :**<br>7 × 2 = 14 | |
| 21. | केसोबास यांचा थोडक्यात परिचय लिहा.<br>**उत्तर :**<br>* केसोबास उर्फ केशिराज बास ( तेरावे शतक )<br>* महानुभाव पंथातील ज्येष्ठ ग्रंथकार व संस्कृत पंडित<br>* नागदेवाचार्याचे पट्टशिष्य. महानुभाव साहित्यात मोलाची भर.<br>**ग्रंथरचना :** 'श्री चक्रधरोक्त सूत्रपाठ', 'मूर्तिप्रकाश' गुढे 'रत्नमालास्रोत्र' 'दृष्टांतस्रोत्र' इ.<br>* लीळाचरित्रातील दृष्टांतांचे संकलन इ. स. 1285 च्या सुमारास 'दृष्टांतपाठ' ग्रंथात केले. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 22. | ''आत्मविश्वास ही दैवी शक्ती आहे.'' असे डॉ० बाबासाहेब आंबेडकर का म्हणतात ?<br>**उत्तर :** ''मी जे करीन ते होईल'' हे सर्व आत्मविश्वासाने शक्य होते. या शक्तीच्या जारावरच अनेक संकटावर मात करता येते. इंग्लंडमधील 8 वर्षाचा अभ्यासक्रम 2 वर्षे 3 महिन्यात पूर्ण करणे हे आत्मविश्वासामुळेच शक्य झाले. | 2 |
| 23. | सावित्रीबाई चार वर्षाच्या झाल्या तेव्हा त्यांची आई त्यांना काय म्हणाली ?<br>**उत्तर :** ''भाकरी टाकायला शिका आता, मोठी झालीस नव्हं तू. कारटे ! आता लगीन करायला हवं तुझं.'' | 2 |
| 24. | ''फार सुंदर सेवा केलीत शारदांबेची.'' संदर्भासह स्पष्टीकरण करा.<br>**उत्तर :** **संदर्भ :** पाठाचे नाव – स्वरगंगा<br>लेखिका – प्रा. संध्या देशपांडे<br>शंकराचार्यांनी गंगूबाईंना उद्देशून म्हटले<br>**स्पष्टीकरण :** शृंगेरीत गंगूबाईच्या गाण्याच्या कार्यक्रमात शंकराचार्यांची उपस्थिती. गंगूबाईंना मठात बोलावून त्यांचा सत्कार करताना गाण्याची केलेली तारीफ. | 2 |
| 25. | शाहीर रामजोशी यांचा परिचय लिहा.<br>**उत्तर :** राम जगन्नाथ जोशी ( इ. स. 1762 - 1812 ) वेदशास्त्र संपन्न पंडिताचे घराणे पण रामला तमाशाची आवड होती. रामने तमासगीर लोकात वावरणे हे त्यांच्या कुटुंबाला व समाजालाही रूचणारे नव्हते. पण ते तमाशातच रमले. त्यांच्या रचनेत संस्कृत प्रचुरता दिसते. शाहिरी वाङ्मयाला प्रतिष्ठा मिळवून दिली. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 26. | 'सुन्या तिच्याही दाही दिशा' या कवितेतील स्त्रिया कोणकोणते कष्ट सहन करतात ?<br>**उत्तर :** भर दुपारी उन्हात पाणी आणतात. कणी कोंडा पाखडून सत्व उचलतात. आपले दुःख इतरांना न सांगता स्वतः सहन करतात. चिकाटीने जिद्दीने जीवन जगतात. त्या आशावादी आहेत. पण सुख वाटयाला येत नाही. | 2 |
| 27. | "विठ्ठला विठ्ठला । आम्ही अन्नभक्त"<br>संदर्भासह स्पष्टीकरण करा.<br>**उत्तर :** **संदभ :** कविता – 'पाठ आणि पोट याचा झाला टाळ'<br>कवी – विंदा करंदीकर<br>भुकेलेल्या जीवांनी विठ्ठलाकडे केलेले विनवणी.<br>**स्पष्टीकरण :** भुके जीव अन्नाविना व्याकुळ आहेत. विठ्ठलाकडे पोटातील भूक शांत करण्याची विनवणी करतात व अन्नभक्त असल्याचे सांगतात. | 2 |
| VI.<br><br>28. | **खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा :** $1 \times 3 = 3$<br>अ) आरोग्यम् धनसंपदा<br>**किंवा**<br>ब) मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धीचे कारण ।।<br>**उत्तर :** कल्पनाविस्तार ( उत्तराचे मुद्दे ) :<br>i) कल्पनेचा शब्दशः अर्थ सांगणे 1<br>ii) उदाहरण व स्पष्टीकरण $1\frac{1}{2}$<br>iii) तात्पर्य $\frac{1}{2}$ | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| VII. | **खालील प्रश्नांची उत्तरे पाच-सहा वाक्यात लिहा :** $10 \times 3 = 30$ | |
| 29. | वसईच्या किल्ल्यातील भेद जाणून घेण्यासाठी कोणीकोणी कसे प्रयत्न केले ?<br>**उत्तर :**<br>**खंडोजी माणकर –** गुराखी बनून माहिती मिळविली<br>**आजूरकर पंचकळशे –** सुतारकाम पत्करले<br>**दुल्लबाजी मोरे –** कासारपण पत्करले व गुप्तपणे माहिती मिळविली. | 3 |
| 30. | लेखकाला व त्यांच्या कुटुंबियांना जेवण सोडून अर्धपोटी का उठावे लागले ?<br>**उत्तर :** लेखकाचे कुटुंबिय एकत्र जेवणासाठी बसलेले असतात तेव्हा काकू तपकिरीची पूड नाकपुड्यात कोबते तेव्हा 'आक्छ्' असा आवाज करत सर्व अन्नपदार्थावर उदकसिंचन होते वाढलेल्या अन्नाशिवाय दुसरे अन्न घेण्याची इच्छा कोणालाही झाली नाही म्हणून. | 3 |
| 31. | 'मदर्स युनियन' या संस्थेची माहिती लिहा.<br>**उत्तर :** जपानमधील महत्वाची संस्था, तीन मजली इमारत. पहिल्या मजल्यावर संस्थेचे ऑफिस. दुसऱ्या मजल्यावर पालकांची संस्था. तिसऱ्या मजल्यावर शिक्षक संघटनेचं कार्यालय. संस्थेच्या अध्यक्षा 70 - 75 वर्षाच्या असल्यातरी त्या खूप उत्साही होत्या. मातानां मार्गदशन करणे व अनाथ मुलांना आश्रय देणे हे या संस्थेचा हेतू आहे. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 32. | पिंपळ, बांबू, चाफा या वृक्षांची कोणती वैशिष्ट्ये लेखक गुलजार यांनी सांगितली आहेत ?<br>**उत्तर :** **पिंपळ** पुरातन वृक्ष, त्यातील रेणू मानवी रेणूंशी जुळतात. औषधासाठी उपयोगी वृक्ष.<br>**बांबू –** वनातील वारा 'सोंय सोंय' असा शीळ घालतो तो जणू 'साई साई' देवाचं नाव घेतो असे वाटते. बाबूचा नाश होण्याची वेळ येते तेव्हाच त्याला फुले येतात.<br>**चाफाः –** चाफ्याची फांदी तोडल्यानंतर दुधासारखा चीक निघतो म्हणून लेखक त्याला 'बडी माँ' म्हणतात पानाफुलांचा लपंडाव ही वैशिष्ट्ये. | 3 |
| 33. | लेखक उत्तम कांबळे कोणते दिवास्वप्न पहात असत ?<br>**उत्तर :** "मला चांगली नोकरी लागेल. आक्काला भारी लुगडं घेईन. आण्णाला चाकरीतून मुक्त करन. आक्काला माझ्याकडे ठेवेन. घर बांधेन या दिवास्वप्नात आक्का भारी किंमतीच्या लुगड्यात हसऱ्या चेहऱ्याने दिसत असे." | 3 |
| 34. | श्रीकृष्णाची प्राप्ती न झाल्यास रुक्मिणी काय करणार आहे ?<br>**उत्तर :** जीभ हासडून जीव देणार आहे. त्यानंतर पुढे शंभर जन्म घेवून उग्र तपश्चर्या करून प्रत्यक्ष भगवान शंकरही ज्याला वंदन करतो अशा श्रीकृष्णाला प्राप्त करणार आहे. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 35. | पाहुणे कोठ्न आले आहेत असे आई मुलाला सांगते ?<br>**उत्तर :** जेथून कावळे, गिधाडे, घारी येतात-जेथून डोंगळे, डास, घुंगुरटी येतात. जेथून खोकला, ताप ही दुखणी येतात तेथून पाहुणे आले आहेत. | 3 |
| 36. | पृथ्वीचे प्रेम मिळावे म्हणून तारे, शुक्र, सुधांशू कशाप्रकारे याचना करीत आहेत ?<br>**उत्तर :** **तारे –** नटुनथटून पृथ्वीवर उल्कारूपी फुलांचा वर्षाव करतात.<br>**शुक्र –** प्रभेचा पिसारा फुलवून पहाटेच दारात उभा आहे.<br>**सुधांशू –** सूर्याचेच उसने तेज घेवून पृथ्वीला मोहित करण्याचा प्रयत्न करतो. | 3 |
| 37. | पहिल्या हिरव्या तृणपात्याचा सत्कार कशाप्रकारे करण्यात आला ?<br>**उत्तर :** कठीण परिस्थितीत हे तृणपाते उगवले म्हणून त्याचा सत्कार. त्यासाठी पक्षांनी स्वागत गीत म्हटले. ढगाने मुजरा केला. वाऱ्याने लाल मातीचा गुलाल उधळला. दक्षिणोत्तर पावसाच्या सरी कोसळल्या. सर्वत्र मृद्‌गंध पसरला. अष्टदिशांतून अभीष्टचिंतनाचा जयजयकार झाला. | 3 |
| 38. | 'धरण' कवितेचा थोडक्यात आशय लिहा.<br>**उत्तर :** 'धरण' कवितेतील स्त्री पहाटे उठून दळणकांडण करते. धान्य कमी असल्यामुळे कणीकोंड्याचा स्वयंपाक करते. तान्हया बाळाला पाटीखाली झोपवून, भर उन्हात पायाला पानं बांधून दगड फोडण्याचे काम करते. पिण्यासाठी पाणी मिळत नाही. कष्ट करून देखील सुख मिळत नाही. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| VIII. | **खालील प्रश्नांची उत्तरे आठ-दहा वाक्यात लिहा :** $4 \times 4 = 16$ | |
| 39. | “आपण शेकडा नव्वद टक्के गोष्टी केवळ दुसऱ्यांकरिता करीत असतो” असे लेखक का म्हणतात ?<br>**किंवा**<br>पावसाळ्याचा हिशेब अनंत काणेकरांनी कसा पटवून दिला आहे ?<br>**उत्तर :** एखाद्या व्यक्तिचे वर्तन पाहून सर्वजण तसे वागतात. त्या गोष्टीपासून होणाऱ्या फायद्या-तोटयाचा विचार करत नाहीत. इतरांच्या सुखासाठी स्वतः दुःखही सहन करावे पण काहीच उपयोगाच्या नसलेल्या गोष्टी करुन उगाच जीवाचा कोंडमारा करुन घेऊ नये. तसे वागले तर मग मेंढ्या आणि माणस यांच्यात फरक काय ?<br>**किंवा**<br>पावसाळा आदमासे चार महिने म्हणजे एकशे वीस दिवस. त्यापैकी साठ दिवस पाऊस पडतो. त्यातून तीस दिवस रात्रीचा पडतो. उरलेल्या तीस दिवसातून कामाच्या ठिकाणी असताना पंधरा दिवस जातात. थोड्या रिमझिम पावसात कुठेतरी झाडाखाली थांबून घरी जावू शकतो. असे सात दिवस जातात. आता आठ दिवस उरले. आपण जायला यायला आणि जोराचा पाऊस पडायला असा योगायोग केवळ चार वेळा येतो. चार महिन्यातून केवळ चारवेळा छत्रीचा वापर होतो. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 40. | डॉक्टर रवींद्र कोल्हे यांनी शिबीरामध्ये शेती, आरोग्य, पर्यावरण व शासकीय योजना याविषयाची मुलांना कोणती माहिती दिली ?<br>**किंवा**<br>डॉक्टरांनी सुरू केलेल्या शिबीराचा कोणता अदृश्य परिणाम झाला ?<br>**उत्तर : शेती –** शास्त्रोक्त पद्धतीने शेती केली तर कसे फायदेशीर ठरते याची प्रात्याक्षिकांसह माहिती.<br>**आरोग्य –** कुपोषण टाळण्यासाठी आहार. स्वच्छ पाणी व लसीकरणाचे महत्त्व. औषधाचे दुष्परिणाम.<br>**पर्यावरण –** आपणच जगलसंपत्तीचे खरे मालक आहात. तुमच्या वाडवडिलांनी त्याच संवर्धन, संरक्षण केले. येथे राहूनच अर्थाजन करावे.<br>**शासकीय योजना –** आदिवासी लाकांसाठी शासनाने आखलेल्या योजनांची माहिती देऊन. जागरूकता निर्माण केली.<br>**किंवा**<br>शिबोरामुळे पाचशे कार्यकर्त्यांची एक फळी तयार झाली. ही मुले शेतीत प्रयोग केले. कर्ज कुठे व कसे मिळते ? ते कसे फेडावे याची माहिती देऊ लागले. त्यामुळे आदिबासी लोकांत आर्थिक बदल झाला. आत्महत्या थांबल्या. याचे श्रेय या शिबिरालांच जाते. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 41. | 'या भारतात बंधुभाव' या कवितेचा सारांश लिहा.<br>**उत्तर :** भारत देशात बंधुभाव नांदावा, जात, धर्म, पंथ, गरीब-श्रीमंत असे सर्व भेदभाव विसरून सर्वांनी एकमताने राहावे. येथील तरुण उद्योगी व चारित्र्यसंपन्न असावा. जातिभेद अस्पृश्यता मुळापासून नष्ट व्हावी. दुष्ट-निंदकाच्या मनातही सत्य व न्यायाची भावना असावी. घरोघरी स्वर्गीय आनंद असावे. संकटाची भीती नसावी. अस वरदान कवी देवाकडे मागतात. | 4 |
| 42. | खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा :<br>कोंदला अंधार ....................................<br>......................................................<br>......................................................<br>............................................ जीविती.<br>**किंवा**<br>देश ज्यांचा .......................................<br>......................................................<br>......................................................<br>.......................................... ततक्षिती.<br>**उत्तर :** कोंदला अंधार मार्गी खाचखड्डे मातले<br>तस्करांनी वेढिले<br>संभ्रमी त्या जाहले कृष्णापरी जे सारथी<br>गाउ त्यांना आरती<br>स्वार्थ हेतूला दिला संक्षेप ज्यांनी जीविती.<br>**किंवा**<br>देश ज्यांचा देव त्यांचे दास्य ज्यांचा धर्म हो<br>दास्य मुक्ति ध्येय हो<br>आणि मार्कंडेयसे जे जिंकिती काळाप्रती<br>गाउ त्यांना आरती<br>देह जावो देह राहो नाही त्यांना तत्क्षिती. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| IX. | **खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :** 1 × 4 = 4 | |
| 43. | मातेच्या प्रेमाशी कशाचीच तुलना होऊ शकत नाही. प्रत्येक माता आपल्या बाळाच्या संगोपनासाठी त्याच्या प्रगतीसाठी सतत प्रयत्न करीत असते. ती आपल्याला ममतेने आपुलकीने वाढवते. दया, प्रेम, मानवधर्म, भूतदया यांचे धडे देते. वेळप्रसंगी कठोर वागते पण मुलांवर सुसंस्काराचे बोजारोपण करते. आई ही जणू कुटुंबांतील दीपस्तंभ असते. आपल्या घरासाठी दुःखाचा डोंगर पेलणारी ती माताच असते. म्हणून तिच्या रूपात परमेश्वर दिसतो. श्रावण बाळाने आपल्या आई-वडिलांना कावडीत बसवून देवदर्शन घडवून आणले. तर भक्त- पुंडलिकाने प्रत्यक्ष पांडुरंग दारात आल्यानंतर देखील आई-वडिलांच्या सेवेत खंड पडू दिला नाही. अशा अनेक उदाहरणातून मातृभक्ती दिसून येते. आईच्या संस्कारांची शिदोरी आपल्याबरोबर कायम असते. आईच्या ऋणातून कोणीही मुक्त होऊ शकत नाही. | |
| | **प्रश्न :** | |
| | अ) प्रत्येक माता आपल्या मुलावर कशाप्रकारे संस्कार करते ? 2 | |
| | ब) वरील उताऱ्यात कोणत्या उदाहरणातून मातृभक्ती दिसून येते ? 2 | |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| | **उत्तर :**<br>अ) प्रत्येक माता आपल्या बाळाच्या संगोपनासाठी, त्याच्या प्रगतीसाठी सतत प्रयत्न करते. दया, प्रेम, मानवधर्म यांचे धडे देते. वेळप्रसंगी कठोर वागते पण मुलावर संस्काराचे बीजारोपण करते. 2<br>ब) श्रावण बाळाने कावडीतून आई-वडीलांना देवदर्शन घडवले. भक्त पुंडलीकाने आई-वडीलांची अखंड सेवा केली. 2 | 4 |
| X.<br><br>44. | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा :**<br>$1 \times 5 = 5$<br>दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर तुम्ही पुढे काय करणार आहात ते तुमच्या मित्राला / मैत्रिणीला पत्राद्वारे कळवा.<br>**किंवा**<br>शाळा सोडल्याचा दाखला मिळविण्यासाठी मुख्याध्यापकांना अर्ज लिहा.<br>**उत्तर : पत्र :**<br>i) प्रेषक पत्ता (पाठविणाऱ्याचा पत्ता व दिनांक) 1<br>ii) मायना 1<br>iii) विषय मांडणी व भाषा सजावट 2<br>iv) समारोप व स्वाक्षरी $\frac{1}{2}$<br>v) कोणाला पत्र पाठवावयाचे त्याचा पत्ता $\frac{1}{2}$<br>**किंवा**<br>**अर्ज :**<br>i) प्रेषक पत्ता (पाठविणाऱ्याचा पत्ता व दिनांक) 1<br>ii) मायना ( अधिकाऱ्याचा हुद्दा ) 1<br>iii) विषय मांडणी $\frac{1}{2}$<br>iv) मजकूर 2<br>v) सही व पत्ता (कोणाला अर्ज पाठवायचा) $\frac{1}{2}$ | 5<br><br>5 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| XI. | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधलेखन करा :** $1 \times 5 = 5$ | |
| 45. | अ) वाचन : एक उत्तम छंद<br><br>ब) वाढती लोकसंख्या – एक समस्या.<br>**उत्तर :** निबंधलेखनाचे मुद्दे :<br>i) आकर्षक प्रारंभ 1<br>ii) विषय ज्ञान 2<br>iii) भाषा सौंदर्य 1<br>iv) शेवट 1 | 5 |